# अधिसुचना

क्र.कलि/भुस/बा.व.ई.प्र.क्र.9 भंडारा/ कावी/ 445 /2020
उप जिल्हाधिकारी ( भुसं) जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा.
दिनांक – 31 /12/2020

**भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांनस उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम** 2013.

ज्याअर्थी , समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने भुमिसंपादन , पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसुचना क्रमांक 374 दिनांक 04/09/2019 अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे.आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे.की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजसाठी आवश्यकता आहे.किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थि , भंडारा जिल्हाधिकाऱ्याने , कलम 15 च्या पोट कलम (2) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे.याबाबत त्यांची खात्री पटली आहे.आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये , उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थि अनुसुची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे वाधित कुटुंबियांच्या पनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असुन पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थि, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन आसलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यांसाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन (बा.व.ई.प्र.क्र.9) भंडारा यास पदनिर्देशित करीत आहे.

Scanned with CamScanner

## अनुसूचि- एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव – कन्हाळगांव तालुका पनवी जिल्हा भंडारा

भुसंपादन प्रकरण क्र. 14 /एलक्युएन/2018-2019

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | 565 | 0.04 |
| एकुण क्षेत्र | | 0.04 हे.आर. |

## अनुसूचि- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- गोसेखुर्द प्रकल्प.

प्रकल्पाचे कार्याचे नाव :- गोसेखुर्द उजवा कालव्यावरुन निर्गमित शेळी उपसा सिंचन योजनेच्या पंपहाऊस 2 चे बांधकामाकरिता.

समाजाला मिळनारे लाभ :- पायाभुत सुविधा

( आर्थिक, रोजगार.पायाभुत सुविधा. सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)

## अनुसूचि- तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

---- निरंक ----

## अनुसूचि- चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

---- निरंक ----

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी भुसंपादन (बा.व.ई.प्र.क्र.9) भंडारा यांचे कार्यालयात निरिक्षण करता येईल.

ठिकाण :- भंडारा

दिनांक 31 / 12/2020

(संदिप कदम भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी , भंडारा.

Scanned with CamScanner